# गट ग्रामपंचायत सावळा

**पं. स. बुलडाणा जि. बुलडाणा**

**(सावळा, हनवतखेड, सुंदरखेड)**

दि. २९/०७/२०१६

## प्रारंभ प्रमाण पत्र

**(मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२ पो. क्र.२)**

प्रति,

श्री./सौ. ~~सौ. श्वेता प्रकाश अंभोरे~~

आपले दिनांक ११/०७/२०१६ चे अर्जावरुन आपला गट नं....६५........ मधील प्लॉट नं. ...२............ चे क्षेत्रफळ २८३.००........ चौ. मिटर यातील ७०४.३४ ........ चौ. मिटरवर संभाव्य इमारतीचे बांधकाम करण्याकरिता आपणास दिनांक २५/०७/२०१६ चे सभेत ठराव क्र. ५ नुसार अनुक्रम नं. १ वर दिलेल्या नकाशा प्रमाणे मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२ व त्या खालील उपविधी अन्वये खालील शर्तीसह परवानगी देण्यात येत आहे.

१) भुखंडा मधील बांधकामाच्या चारही बाजुने खालील प्रमाणे मोकळ्या सोडावयाचे समासाचे अंतर नकाशामध्ये व प्रत्यक्ष बांधकाम करतांना सोडलेले असावे. (अ) समोरील बाजुने ३ मिटर, व उर्वरित तिन्ही बाजुने प्रत्येकी १.५० मिटर अंतर सोडलेले असावे.

२) सदर परवानगी तुम्हास तुमचे स्वतःचे मालकीचे भुखंडामध्ये बांधकाम करण्याकरिता बंधनकारक आहे. इतर कोणत्याही खाजगी दुसऱ्याचे मालकीचे भुखंडावर, सरकारी जमिनीवर तसेच तुमच्या स्वतःच्या मालकीच्या नसलेल्या भुखंडावर बांधकाम करु नये.

३) आजुबाजुने खाजगी अथवा सरकारी जमिनीवर अतिक्रमण करु नये.

४) संभाव्य इमारत बांधकामाचे साहित्य विना परवानगी सरकारी जमिनीवर, रस्त्यावर ठेऊ नये.

५) स्वतःचे भुखंडातील कोणतेही सांडपाणी, सेप्टीक संडासाचे पाणी, पावसाचे साचणारे पाणी हे स्वखर्चाने पक्या नाली द्वारे किंवा पाईप द्वारे रस्त्या लगतच्या पक्क्या नालीमध्ये आणुन सोडलेले असावे. नाली नसेल तर शोष खड्डा खोदावा.

६) सोबत जोडलेल्या मंजुर नकाशात दर्शविल्या प्रमाणे संभाव्य इमारतीचे बांधकाम करण्यांत यावे.

७) इमारत बांधकाम करित असतांना छतावरील पावसाचे पाणी इमारती जवळ शोष खड्ड्यात जिरविण्यात यावे.

८) पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी इमारती समोर कमीत कमी दोन झाडे तरी लावण्यात यावी.

९) शासनाचा निधी प्राप्त होईपर्यंत नाली, रस्ते, ई. पोलची व्यवस्था ज्याची त्याने स्वखर्चाने करावी.

वरील प्रमाणे अटीस आधीन राहुन आपणास घर बांधकाम करण्यास परवानगी दिली आहे. अटीचे पालन न केल्यास बांधकाम परवानगी रद्द करण्याचे अधिकार ग्राम पंचायतला राहतील. याची संबंधीतांनी प्रामुख्याने नोंद घ्यावी, ही विनंती. (१०) इमारतीचे अनुषंगाने पुरेशी वाहनतळ व्यवस्था स्वतःचे जागेतच (CF) करावी (११) बांधकामासाठी पुरेशा क्षमतेचे लोखंड (RCC Design) लावल्याचे प्रमाणपत्र सादर करणे (१२) स्वतंत्र अग्निशामक व्यवस्था करावी. (१३) बांधकामाबाबत कायदेशिरवाद/पेचप्रसंग निर्माण झाल्यास ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही (१४) वरीलपैकी कोणतीही अटीचा भंग झाल्यास सदर परवानगी रद्द समजण्यात येईल.

दिनांक - २९/०७/२०१६.

| | | |
|---|---|---|
| Sarwade<br>सरपंच<br>गट ग्रामपंचायत, सावळा<br>**सरपंच**<br>**गट ग्रामपंचायत सावळा** | (शिक्का)<br>गट ग्रामपंचायत, सावळा<br>जा.क्र. ९-२०१६<br>दि. २९/०७/२०१६ | सचिव<br>गट ग्रामपंचायत, सावळा<br>**सचिव**<br>**गट ग्रामपंचायत सावळा** |